Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# प्रगत अध्यापनशास्त्र आणि अध्यापन

**श्रीमती. पाटील मनिषा भिमसिंग,**
**सहा. प्राध्यापिका,**
**पुणे विद्यार्थी गृहाचे शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय,**
**दिंडोरीरोड, नाशिक - 4**

**प्रास्ताविक :-**

एकविसाव्या शतकात ज्ञानाचा स्फोट झालेला दिसतो. ज्ञानाच्या कक्षा हया झपाटयाने वाढताना दिसतात आणि या वेगवान ज्ञानाच्या युगात शिक्षणातील झालेला बदल महत्वाचा आहे. कारण या बदलामुळेच आपणास गरजेनुसार शिक्षण देता येत आहे व प्रगती स्वरुपातील बदल आपणास पहावयास मिळत आहेत.

बदलत्या युगात शिक्षकाची भूमिका बदलती, जबाबदारीची व महत्वपुर्ण झाली आहे.त्यासाठी अध्यापनशास्त्र Pedagogy हे अध्यापकाला जाणून घेणे गरजेचे आहे. शिक्षण प्रक्रियेत अध्ययन व अध्यापन या दोन महत्वाच्या प्रक्रियांचा समावेश होतो. आजचे शिक्षण हे अध्ययनार्थी केंद्रित आहे. अध्यापनापेक्षा अध्ययनाला महत्व प्राप्त झाले आहे. परिणामी शिक्षकाची जबाबदारी वाढली, शिक्षकाच्या भूमिका बदलत गेल्या, शिक्षकाच्या अध्यापनाच्या परिणामाचा विचार केला जाऊ लागला. त्यासाठी अध्यापन करताना अध्यापक त्या विषयामध्ये नाविन्यता, विविधता, रोचकता, रंजकता यावी म्हणून विविध युक्त्या - प्रयुक्त्या शोधून त्या पध्दतीने अध्यापन करण्याचा प्रयत्न करीत असतो. अध्यापकाला आपले अध्यापन अधिक प्रभावी आणि परिणामकारक करण्यासाठी अध्यापकाला प्रगत अध्यापनशास्त्र माहिती असणे व त्याचा योग्य प्रकारे वापर करता येणे गरजेचे आहे.

काळानुसार शिक्षक केंद्रित शिक्षण अध्यापन मागे पडतांना दिसते व विद्यार्थी केंद्रित अध्यापन पध्दती अधिक परिणामकारक ठरत आहे आणि ही काळाची गरज आहे. अध्यापनशास्त्रातून विद्यार्थ्यांना जीवन जगण्यास योग्य असे अध्ययन अनुभव देणे गरजेचे ठरते.म्हणजेच काय तर विद्यार्थ्यांना सामाजिक आणि सार्वत्रिक जीवनात जगण्याचे कौशल्य शिकविले पाहिजे. या बदलत्या वातावरणात परिस्थितीत अध्यनार्थ्याला टिकून राहण्यासाठी कृतीशील सहभागी होण्यास प्रवृत्त करेल असेच शिक्षण शिक्षकांने अध्यापनशास्त्रातून दिले पाहिजे.

**अध्यापनशास्त्र व्याख्या**


**Pedagogy - म्हणजे अध्यापनाची पध्दती** : अशी पध्दती की ज्यामध्ये अध्यापनाच्या पध्दती आणि कार्यवाहीचा समावेश होतो.

- अध्यापनशास्त्र हे शिक्षणाचे शास्त्र व कलात्मक अंग आहे. अध्यापनशास्त्राचा विस्तार हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासापासून ते कौशल्य आत्मसात करण्यापर्यंत आहे.
- अध्यापनशास्त्रात अध्यापनातील विविध पध्दतींचा व विविध कृतींचा समावेश होतो.
- The art or Science of teaching, education, instructional methods.
- Pedagogy is the Science and art of education. Its aim range from the full development of the human being.

यावरुन असे म्हणता येईल की अध्यापनशास्त्रातून प्रामुख्याने विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबर, कौशल्य विकसित करुन त्यांच्या जीवनातील कुठल्याही बाबींकडे बघण्याचा दृष्टीकोन विकसित करणे होय.

**प्रगत अध्यापनशास्त्र - महत्व :-**

**Importance of Advance Pedagogy**




1) आजच्या बदलत्या व वेगवान ज्ञानाच्या युगात टिकून राहण्यासाठी शिक्षकाला प्रगत अध्यापनशास्त्राचा फार मोठया प्रमाणात उपयोग होत आहे.

2) वाढती माहिती, तंत्रज्ञान, विविध साधने, माध्यम पध्दती, कृती या सर्वांची ज्ञान आत्मसात करण्यासाठी

प्रगत अध्यापनशास्त्र महत्वाचे आहे.

3) यशस्वी, समाधानी आयुष्य जगण्याचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी अध्यापनशास्त्र महत्वपुर्ण आहे.अन्यथा या स्पर्धेच्या जगात टिकून राहण्यासाठी असमर्थ असेल.

4) बदलत्या युगात समायोजन साधण्यासाठी व आधुनिक जगाबरोबर स्पर्धा करण्साठी अध्यापनशास्त्र महत्वपुर्ण आहे.

5) बदलत्या काळानुसार बदलती भूमिका स्वीकारण्यासाठी व ती जबाबदारिने पार पाडण्यासाठी त्याला अध्यापनशास्त्रामुळेच अध्ययन - अध्यापनाचे योग्य तंत्र आत्मसात करता येईल.

6) विविध नव नविन अध्यापनाचे कौशल्य आत्मसात करण्यासाठी अध्ययन - अध्यापन ही शिक्षणाची महत्वपुर्ण आंतरक्रिया आहे आणि ती यशस्वी करण्यासाठी प्रगत अध्यापनशास्त्र महत्वपुर्ण आहे.

अध्यापन यशस्वी झाले असे म्हणायचे असेल तर त्यासाठी अध्ययन यशस्वी होणे आवश्यक आहे म्हणजेच काय ? तर अध्ययन झाले तरच अध्यपन झाले असे म्हणता येईल.वेगळया अर्थाने अध्ययन झाले नसेल तर अध्यापन झाले आहे असे म्हणता येणार नाही या दोन्ही महत्वपुर्ण व परस्परांवर अवलंबुन असलेल्या प्रक्रिया आहेत. त्या प्रभावी होण्यासाठी प्रगत अध्यापनशास्त्र महत्वाची भूमिका बजावताना दिसते.

**प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक बाबी :-**

1) शिक्षकांची वृत्ती

2) शिक्षक विद्यार्थी संबंध

3) पाठाची उद्दिष्टे

4) शिक्षकांचे विषय ज्ञान

5) आधुनिक तंत्रे व पध्दतीचा समावेश

प्रगत अध्यापनशास्त्रानुसार शिक्षकाच्या भूमिकेत काळानुसार बदल झालेला आहे.शिक्षणातील अध्ययन - अध्यापन प्रक्रियेतील अध्यापक आणि अध्ययनार्थी या दोन महत्वाच्या घटकात आता अध्ययनार्थी सर्वात महत्वाचा घटक आहे. कारण दिलेल्या ज्ञानाचा त्याला यशस्वी जीवन जगण्यासाठी योग्य उपयोग करता येणे, बदलत्या स्पर्धेच्या युगात अध्ययनार्थ्यांने टिकून राहण्यासाठीचे शिक्षण देण्यासाठी विद्यार्थी केंद्रित शिक्षण

आवश्यक आहे. त्यासाठी विविध विद्यार्थी केंद्रित शिक्षण अध्यापनाचा वापर केला पाहिजे व प्रभावी अध्यापन करता आले पाहिजे.

**प्रगत अध्यापन शास्त्र - कार्यनीती**

**Advanced Pedagogy - Strategy**

**Advanced Pedagogy Strategy**

1) सांघिक अध्यापन - Team Teaching
2) सांघिक चर्चा पध्दती - Group Discussion Method
3) सहकार्यात्मक व सहभागात्मक अध्ययन - अध्यापन
Co-operative & collaborative Teaching - Learning
4) तंत्रज्ञानावर आधारित ICT चा वापर
( LCD Projector, O.H.P. Internet )
5) प्रकल्प पध्दती - Project Method
6) क्षेत्र भेटी - Field Visit
7) प्रत्यक्ष अनुभव - Live Experiences
8) सक्रिय अध्ययन - Active Learning
9) समस्या निराकरण पध्दती (विमोचन )
Problem solving method
10) सर्जनशील लेखन व विचार
Creative writing & thinking
11) प्रतिमान अध्यापन पध्दती
Model Teaching Method

वरील विविध व प्रगत अध्यापनशास्त्राच्या कार्यनीतीचा वापर अध्ययन अध्यापन प्रक्रियेत केला तर निश्चितच त्याच्यातून आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी व यशस्वी जीवन जगण्यासाठी त्यास उपयुक्त असे शिक्षण प्रगत अध्यापन शास्त्राद्वारे देता येईल. त्याचे विविध उपयोग अध्ययनार्थ्यास होतील.

**फायदे -**

1) विविध व नविन तंत्रज्ञानाची माहिती मिळेल व तंत्रज्ञान हाताळण्याचे कौशल्य प्राप्त होईल.

2) उज्ज्वल व यशस्वी भविष्यासाठी उपयुक्त शिक्षण देता येईल.
3) प्रभावी अध्ययन - अध्यापन घडण्यास उपयुक्त असेल.
4) विद्यार्थी शिक्षक यांच्यात आंतरक्रिया चांगल्या प्रमाणात घडेल व शिक्षक - विद्यार्थी संबंध सकारात्मक होण्यास बळकटी मिळेल.
5) प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना देता येतील व त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी होता येईल, अध्ययनार्थी सक्रिय होण्यास मदत होईल.
6) समस्येची हाताळणी व समस्या सोडविण्याची कला प्राप्त होईल.
7) विविध प्रतिमानाचा वापर करता येईल, विशिष्ट विषयासाठी विशिष्ट प्रतिमानाचा वापर केल्यामुळे निश्चित प्रभावी अध्ययन होण्यास मदत होईल.
8) सहकार्यात्मक व सहभागात्मक अध्ययनामुळे सहकाराची भावना निर्माण होईल व प्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे अध्ययन प्रभावी होण्यास मदत होईल.
9) स्पर्धेच्या युगात सर्जनशील विचारांना प्राधान्य आहे, त्यासाठी अध्ययनार्थ्याला सर्जनशीलतेचे कौशल्य प्राप्त होईल, वेगळया दिशेने विचार करण्याची दृष्टी अध्यायानार्थ्यास निर्माण होईल.
10) सांघिक अध्यापनाच्या वापरामुळे बलस्थाने व कमकुवत बाबी लक्षात येऊन त्यानुसार बदल करता येतील व उपाययोजना राबवता येतील, यातून सांघिक भावना वाढीस लागेल.
11) विविध विषयांची सांघिक चर्चा घडवून आणल्यामुळे मते मांडण्यास संधी मिळेल, विचारांची देवाणघेवाण करता येईल, आत्मविश्वास वाढेल.
12) विविध अध्यापन तंत्राचा, सूत्रांचा वापर करता येईल व अध्ययन अध्यापन सुखकर होण्यास मदत होईल.

अशा अनेक फायदे; कार्यनीती वापरल्यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया बळकट करता येईल, कारण अध्यापन होण्यासाठी अध्ययन होणे गरजेचे आहे. अध्ययन झाले तरच आपण अध्यापन झाले असे म्हणू शकतो त्यासाठी प्रगत अध्यापनशास्त्राचा वापर अध्यापनात होणे आवश्यक आहे त्यामध्ये विद्यार्थ्याच्या भूमिकेचे महत्वाचे स्थान आहे. प्रगत अध्यापन शास्त्राच्या वापरामुळेच आजच्या अध्ययनार्थ्याला यशस्वी जीवनाची दिशा मिळू शकते आणि अध्ययनार्थी यशस्वी झाला तरच या स्पर्धेच्या युगात टिकून राहील व समायोजन साधण्यास सक्षम असेल.

**संदर्भ :**

1) अध्यापनशास्त्र आणि पध्दती - म.बा. कुंडले
2) प्रगत अध्यापनशास्त्र - प्रा. पंकज नागमोती, प्रा. सुनिल देसले
3) आशययुक्त अध्ययन पध्दती - प्रा. अनंत जोशी.